दैनिक
लातूर :
वर्ष : २१
अंक : ७७
वार : शुक्रवार, दिनांक : ०८ ऑगस्ट २०२५
किंमत : २/- पाने : ४
PRGI No.MHMAR/25/A3861
लातूर- नांदेड- पुणे

# साहित्य सम्राट

मुख्य संपादक :-पंडित हणमंते , मो . नं . ९९६७०१४०४
sahityasamrat@gmail.com

# अल फारुख उर्दू विद्यालयत विद्यार्थ्यांना सायबर सुरक्षेचे मार्गदर्शन कार्यशाळा संपन्न



चाकुरः-डिजिटल युगात इंटरनेट, मोबाईल आणि सोशल मीडियाचा वापर मोठ्या प्रमाणावर वाढत असल्याने विद्यार्थ्यांमध्ये सायबर सुरक्षेबाबत जागरूकता निर्माण करण्याच्या उद्देशाने तर्फे राबविण्यात येणाऱ्या अंतर्गत अलफारुख उर्दू विद्यालय नळेगाव येथे सायबर सुरक्षा जनजागृती कार्यशाळेचे आयोजन करण्यात आले होती.या कार्यशाळेत सायबर वॉरियर्स जान्हवी सोरटे आणि जोहा कोतवाल यांनी विद्यार्थ्यांना फिशिंग, मजबूत पासवर्ड तयार करणे, व वैयक्तिक माहिती कोणालाही शेअर न करणे, सोशल मीडियाचा सुरक्षित वापर, ऑनलाइन फसवणूक ओळखणे, डिजिटल पेमेंट करताना घ्यावयाची काळजी तसेच सायबर गुन्ह्यांपासून स्वतःचे संरक्षण कसे करावे याबाबत सोप्या आणि प्रभावी भाषेत मार्गदर्शन केले. यावेळी विद्यार्थ्यांना संशयास्पद लिंक, बनावट संदेश, फसवे फोन कॉल आणि ऑनलाइन गेमिंगमधील फसवणुकीपासून सावध राहण्याचे आवाहन करण्यात आले. तसेच सायबर गुन्हा घडल्यास तात्काळ राष्ट्रीय सायबर हेल्पलाईन क्रमांक १९३० वर संपर्क साधावा आणि अधिकृत सायबर क्राइम पोर्टलवर तक्रार नोंदवावी, अशी माहिती देण्यात आली. या उपक्रमामुळे विद्यार्थ्यांमध्ये सुरक्षित आणि जबाबदार इंटरनेट वापराबाबत जागरूकता निर्माण झाली. कार्यशाळेला शाळेचे मुख्याध्यापक वहाब जागीरदार,मुख्याध्यापक कादीर जागीरदार, मुजीब शेख, हाशमी मैनोद्दीन, हुसैन घोरवाडे, इर्शाद पिरजादे, युनूस शेख,शिक्षकवृंद तसेच मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.सर्वांनी या उपक्रमाचे कौतुक करत भविष्यातही अशा जनजागृती कार्यक्रमांचे आयोजन करण्याची अपेक्षा व्यक्त केली.